PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

**जा.क्र.शिउसं/लेखा-२/अमासूअ/२०१०**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.**
**दिनांक :**

**प्रति,**

**सर्व दुय्यम कार्यालये,**
**पुणे विभाग.**

**विषय : शिक्षण संचालनालयाच्या वित्तीय नियंत्रणा खालील राज्य व स्थानिक क्षेत्रातील सर्व प्रधानशिर्षाचे योजनेतर व योजनांतर्गत. खर्चाच्या बाबीवरील सन २०११-१२ चे आठमाही सुधारीत अंदाजपत्रक (अनुशेष व विना अनुशेषांसह). . .**

**संदर्भ : मा. शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक अंदाज-५/अमासू/२०११-१२/२६ फ/१३९२४, दिनांक ५.११.२०११**

शासनाने सुधारित अंदाजपत्रक पाठविण्याकरिता विहित केलेल्या कार्यक्रमानुसार सन २०११-१२ या वर्षाचे आठमाही अंदाजपत्रक संकलित करुन संचालनालयास सादर करावयाचे आहे. चालू वर्षाचे आठमाही सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी वेळोवेळी दिलेल्या सूचना विचारात घ्याव्यात व सुधारित अंदाजपत्रक बिनचूक तयार करण्यांत यावे. या पत्रासोबत जोडलेले विवरणपत्र एक ते सात मध्ये प्रत्यक्ष खर्च व उर्वरित कालावधीसाठी संभाव्य रकमेची गरज लक्षात घेऊन विवरणपत्रे तयार करावीत.

सुधारित अंदाजपत्रक सादर करण्याबाबत वेळोवेळी ज्या सूचना निर्गमित केल्या आहेत त्यासर्व विचारात घेऊन हे सुधारीत अंदाजपत्रक तयार करावे. प्रामुख्याने खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१) **वेतन :-** योजनेत्तर व योजनांतर्गत योजनेखाली मंजूर असलेल्या पदांची संख्या अचूकपणे दर्शविण्यात यावी. अनुज्ञेय वेतन बँड / ग्रेड वेतनानुसार मंजूर पदे, त्यापैकी भंरलेली पदे व रिक्त पदे यांची माहिती देण्यात यावी. सुधारित अंदाजपत्रकामध्ये मागील ३ ते ५ वर्षातील पदांच्या संख्येची पडताळणी करुनच वेतन अनुदान मंजूर केले जाते हे आपणास ज्ञात आहेच. वेतन या उदिष्टाखाली आवश्यक असणारी (कमी/जादा) तरतूद मिळण्यासाठी आवश्यक त्या समर्थनासह सादर करणे गरजेचे आहे. (उदा. शासन निर्णयीच प्रत, संचालनालयाचे पदांचा आढावा घेऊन निश्चित केलेली पदसंख्या इ.)

२) **महागाई भत्ता :-** राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्याचा शासन निर्णय क्रमांक मभवा/१११११/प्र.क्र.६४/सेवा-९, दिनांक २६ एप्रिल २०११ अन्वये १ मे २०११ पासून ४५ टक्के वरुन ५१ टक्के महागाई भत्ता वाढविण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक मभवा/११११/प्र.क्र. ६४/सेवा-९, दिनांक ४ ऑक्टोंबर २०११ अन्वये १ ऑक्टोंबर २०११ पासून ५१ टक्के वरुन ५८ टक्के महागाई भत्ता वाढविण्यात आलेला आहे. त्याप्रित्यर्थ प्रत्यक्षात जी जादा तरतूद लागणार आहे त्याची माहिती सर्व तक्त्यातील संबंधित स्तंभामध्ये दर्शविण्यात यावी व ही ही मागणी सत्यतेवर आधारित असावी, त्याचे स्पष्टीकरण अंदाजपत्रक सादर करतांना संबंधितास देता आले पाहिजे.

३) **घरभाडे भत्ता :-** शासन निर्णय वित्त विभाग क्र. घभाभ १००९/प्र.क्र. ६७/सेवा-५, दिनांक २४ ऑगस्ट, २००९ अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना सुधारित दराने घरभाडे भत्ता लागू करण्यात आलेला आहे. त्या प्रित्यर्थ प्रत्यक्षात जी जादा तरतूद लागणार आहे त्याची माहिती सर्व तक्त्यातील संबंधित स्तुंभामध्ये दर्शविण्यात यावी व ही मागणी सत्यतेवर आधिरित असावी. त्याचे स्पष्टीकरण अंदाजपत्रक सादर करतांना संबंधितास देता आले पाहिजे.

४) **प्रवास व कार्यालयीन खर्च इत्यादी. :-** कार्यालयीन खर्च, पेट्रोल, तेल, वंगण इत्यादी खर्च, वेतनेतर सहाय्यक अनुदान इ. उद्दिष्टाखाली मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे तरतूद वितरीत केलेली आहे. त्यानुसार आपणास उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीच्या मर्यादेपर्यन्तच आपण दरमहा खर्च सिमित करावा. यदा कदाचित जादा तरतुदीची मागणी करावी लागली तर त्याची सबळ कारणे सविस्तर

PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

सेच यामध्ये नियमित वाढीव खर्चाच्या व्यतिरिक्त काही थकित प्रित्यर्थ शासनास पूरक मागणी प्रस्ताव संबंधितांनी विनाविलंब क आहे. त्याशिवाय थकित मागणीचा विचार शासन स्तरावरुन ी वर्षनिहाय माहिती स्वतंत्र कारणांसह द्यावी.

५) **प्रोत्साहन भत्ता :-** आदिवासी विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक आस्था/१७०/प्र.क्र. ११४/का-१५, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ दिनांक १७ मार्च, २००३ अन्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना सुधारित प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यात आला आहे. दिनासंक ५.२.१९९९ व ६.८.२००२ च्या शासन निर्णयानुसार ज्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे. त्या कार्यालय प्रमुखांनी सोबत जोडलेल्या विवरण पत्रानुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तरी त्याबाबत आवश्यक असणाऱ्या तरतूदींची माहिती सोबतच्या विवरणपत्र क्र. ६ मध्ये द्यावी.

शासनाने मंजूर केलेल्या शासन निर्णयान्वये बारा वर्ष सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना द्यावयाची कालबध्द पदोन्नती याबाबत वेतनश्रेणीनिहाय लाभार्थ्यांची संख्या व त्यावर लागणारी आर्थिक तरतूद याची माहिती देण्यात यावी.

६) **शासन निर्णय दिनांक २२.४.२००९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ अन्वये वेतन सुधारित झाल्यामुळे १.१.२००६ ते ३१.३.२००९ पर्यंतची थकबाकीबाबत (२००८-०९ मध्ये दिलेली अग्रीम वजा जाता) माहिती विवरणपत्र क्रमांक ९ मध्ये द्यावी.**

सन २०११-१२ चे आठमाही अंदाजपत्रक सादर करतांना सर्व संबंधित कार्यालयांनी एप्रिल २०११ ते नोव्हेंबर २०११ अखेरचे लेखाशिर्षनिहाय मासिक खर्च अहवाल दोन प्रतीत सादर करावेत. तसेच बील रजिस्टर अंदाजपत्रक सादर करतांना सोबत आणावे अन्यथा आठमाही अंदाजपत्रके स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सर्व प्रकलन अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवावे की, वेतनेत्तर बाबींवर सन २०११-१२ मान्य तरतूदीपेक्षा जास्त रक्कम मंजूर केली जाणार नाही. मात्र अनपेक्षित कारणामुळे वेतनेत्तर बाबींवर खर्च करणे आवश्यक असेल तर त्याबाबत स्पष्टीकरणात्मक टिप्पणी स्वतंत्र सादर करावी.

खर्चामध्ये काटकसर, गरज व महत्व यासंबंधी आपणांस वेळोवेळी सूचना देण्यांत आलेल्या आहेत. त्याचा विचार करुन खर्च मंजूर तरतूदीमध्ये सिमित करण्याचा प्रयत्न करण्यांत यावा.

सोबत जोडलेल्या विवरणपत्र चार मध्ये महसूली व जमा रकमांचे अष्ट मासिक सुधारीत अंदाजपत्रक व्यवस्थितपणे तयार करण्यांत यावे.

सुधारित आठमाही अंदाजपत्रक छाननी कार्यक्रम पत्रिका (विवरणपत्र ८) सोबत जोडले आहे त्यात निर्देश केलेल्या तारखेला व निर्देशित स्थळी सुधारीत अंदाजपत्रके न चुकता माहितीगार व्यक्ती बरोबर पाठवावीत. येताना बरोबर बिल रजिष्टर घेवून येणे आवश्यक आहे.

पुरेशा माहितीअभावी जादा मागणीचे कोणतेही सूधारीत अंदाजपत्रक स्विकारले जाणार नाहीत. निश्चित दिलेल्या तारखेसच सूधारीत अंदाजपत्रक स्विकारले जाईल. उशीरा सादर करण्यात आलेले सूधारीत अंदाजपत्रक सबळ कारणाशिवाय स्विकारले जाणार नाही व यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणीस संबंधित कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत विवरणपत्रे १ ते ८

**(स्नेहल पाटील)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१**

**प्रति,**
**पिठासीन अधिकारी**
**शाळा न्यायाधिकरण,**
**पुणे / सोलापूर**

PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# विवरण पत्र १

## क्षेत्र उपयोजना, विशेष घटक योजना, अनुशेषांतर्गत योजनांचे व सन २०११-१२ करिता आठमाही सुधारित अंदाजपत्रक

वेतन खर्च लेखाशिर्ष (रुपये हजारात)

| | | प्रत्यक्ष खर्च १०-११ | अर्थसंकल्पिय तरतूद २०११-१२ | प्रत्यक्ष खर्च १.४.२०११ ते ३०.११.२०११ | संभाव्य खर्च १.१२.२०११ ते ३१.३.२०१२ | एकूण खर्च २०११-१२ | (+) जादा (-) कमी | कर्मचारी संख्या | वेतनाचा प्रत्यक्ष खर्च (महिनानिहाय) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९. | १०. |
| १ | मूळ वेतन | | | | | | | | एप्रिल ११ |
| २ | ग्रेड वेतन | | | | | | | | मे ११ |
| ३ | महागाई भत्ता ४५ टक्के प्रमाणे मंजूर तरतूद | | | | | | | | जून ११ |
| ४ | महागाई भत्ता ६ टक्के प्रमाणे मे २०११ पासून | | | | | | | | जुलै ११ |
| ५ | दि. १ ऑक्टोंबर २०११ पासून ७ टक्केनुसार आवश्यक महागाई भता | | | | | | | | ऑगस्ट ११ |
| **एकूण महागाई भत्ता** | | | | | | | | | सप्टेंबर ११ |
| ६ | घरभाडे भत्ता | | | | | | | | ऑक्टोबर ११ |
| ७ | स्थानिक पुरक भत्ता | | | | | | | | नोव्हेंबर ११ |
| ८ | वाहतुक भत्ता | | | | | | | | |
| ९ | प्रोत्साहन भत्ता | | | | | | | | एकूण - |
| १० | १२ वर्षे कालबध्द पदोन्नती भार व लाभार्थी | | | | | | | | |
| ११ | रजा प्रवास सवलत योजना (भार) | | | | | | | | |
| १२ | वैद्यकीय प्रतिपूर्ती (भार/लाभार्थी) | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | |
| १४ | अ) ६ वा वेतन आयोग - भनिनि जमा तिसरा हप्ता | | | | | | | | |
| | ब) सहावा वेतन आयोग फरक - रोख देयक | | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | | |

PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# विवरण पत्र २

## देवासी क्षेत्र उपयोजना, विशेष घटक योजना अनुशेषांतर्गत योजनांचे सन २०११-१२ करिता आठमाही सुधारित अंदाजपत्र

## वेतन खर्च

लेखाशिर्ष :

(आकडे हजारात)

| अ.क्र. | खर्चाचे उद्दिष्ट | प्रत्यक्ष खर्च २०१०-११ | अर्थसंकल्पिय तरतूद ११-१२ | प्रत्यक्ष खर्च १.४.२०११९ ते ३०.११.२०११ | संभाव्य खर्च १.१२.२०११ ते ३१.३.२०१२ | एकूण खर्च २०११-१२ | खर्च (-) कमी (+) जादा | कमी/जादा लागणा-या तरतूदी संदर्भात सुस्पष्ट व संदर्भिय कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | वेतन | | | | | | | |
| २ | अतिकालिक भत्ता | | | | | | | |
| ३ | दूरध्वनी, वीज, पाणी | | | | | | | |
| ४ | प्रवास खर्च | | | | | | | |
| ५ | कार्यालयीन खर्च | | | | | | | |
| ६ | भाडेपट्टी व कर | | | | | | | |
| ७ | पेट्रोल तेल, वंगन | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | |

PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# विवरण पत्र ३

## २०११-२०१२ चे आठमाही सुधारित अंदाजपत्रकामधील कार्यालयीन खर्चाचा तपशील

(आकडे हजारात)

| अ. क्र. | कार्यालयीन खर्चाचे अंतर्गत खर्चाची बाब | प्रत्यक्ष खर्च २०१०-११ | अर्थसंकल्पिय अंदाज २०११-१२ (उपलब्ध तरतूद) | १.४.२०११ ते ३०.११.२०११ पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च | १.१२.२०११ ते ३१.३.२०१२ पर्यंतचा अपेक्षित खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | विद्युत खर्च | | | | | |
| २ | दूरध्वनी खर्च | | | | | |
| ३ | पाणीपट्टी खर्च | | | | | |
| **अ** | **एकूण (अ)** | | | | | |
| ४ | गॅस खर्च | | | | | |
| ५ | उष्ण व शित हवामान विषयक खर्च | | | | | |
| ६ | वाचनालय | | | | | |
| ७ | लेखनसामग्री | | | | | |
| ८ | प्रयोगशाळा | | | | | |
| ९ | कार्यालयीन यंत्राची व उपकरणांची खरेदी आणि परिरक्षण | | | | | |
| १० | टपाल खर्च | | | | | |
| ११ | फर्निचर खरेदी | | | | | |
| १२ | फर्निचर दुरुस्ती | | | | | |
| १३ | नमूने छपाई | | | | | |
| १४ | वाहनांचे परिरक्षण | | | | | |
| १५ | इतर खर्च | | | | | |
| १६ | संगणक प्रशिक्षण प्रोत्साहनपर रक्कम/लाभार्थी | | | | | |
| **ब** | **एकूण (ब) (अ.क्र. ४ ते १६)** | | | | | |
| | **एकूण अ + ब** | | | | | |

Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# विवरण पत्र ४

## शिक्षण, कला, क्रीडा व संस्कृती या शिर्षाचे आठमाही सुधारित अंदाजपत्रक (२०११-१२)

## लेखाशिर्ष :-

(आकडे हजारात)

| अ.क्र. | जमेची बाब | २०१०-२०११ मध्ये प्रत्यक्ष जमा | १.४.२०११ ते ३०.११.२०११ पर्यंत प्रत्यक्ष जमा | १.१२.११ ते ३१.३.१२ पर्यंत अपेक्षित जमा | एकूण जमा रकाना ४ व ५ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शिक्षण शुल्क | | | | | |
| २ | परीक्षा शुल्क | | | | | |
| ३ | इतर शुल्क (तपशिलासह) | | | | | |
| ४ | इतर जमा | | | | | |
| ५ | जादा वेतनाची वसूली | | | | | |
| ६ | रजा वेतन | | | | | |
| ७ | भंगार माल रद्दी यांची विक्री पासून उत्पन्न | | | | | |
| ८ | अंशदाने व दाननिधी पासून मिळालेले उत्पन्न | | | | | |
| ९ | केलेल्या सेवेबद्दलच्या प्रदानाची वसूली | | | | | |
| १० | इतर बाबी | | | | | |
| ११ | यु. जी. सी. कडून मिळालेले अनुदान (महाविद्यालयाचे बाबतीत) | | | | | |
| १२ | एकूण जमा | | | | | |
| १३ | एकूण वजा परतावे (-) | | | | | |
| **एकूण जमा शिल्लक** | | | | | | |

Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

## विवरण पत्र क्रमांक ६

### ोजना क्षेत्रात काम करणा-या अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबतची माहिती.

| अ.क्र. | जिल्हा | कार्यालयाचे नांव/ विभागाचे नांव | वेतनश्रेणी गट<br>१. रु. ३०५० पेक्षा कमी<br>२. रु ३०५० ते ४५८९<br>३. रु ४५९० ते ६४९९<br>४. रु ६५०० ते ९९९९<br>५. रु १०००० व पुढे | प्रोत्साहन भत्त्याचा लाभ घेणा-या कर्मचा-यांची संख्या | प्रोत्साहन भत्त्याची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

टीप : - पाचव्या वेतन आयोगानुसार तक्त्यात वेतनश्रेणी देर्शविण्यात आल्या असल्यातरी सहाव्या वेतन आयोगानुसार अनुषंगिक वेतनबँड नमूद करुन माहिती द्यावी.

## विवरणपत्र क्रमांक ७

### थकित देयकांसाठी मागणी करण्यांत आलेल्या रकमांचा तपशिल

(रुपये हजारात)

| अ.क्र. | वर्ष | अर्थसंकल्पिय अंदाजात केलेली मागणी | उपलब्ध झालेली तरतूद | प्रत्यक्ष खर्च व लाभार्थी | थकित देयकांची रक्कम | लाभार्थी संख्या | देयक थकित राहण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.

Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

## विवरणपत्र क्रमांक ७

[illegible] त्र उपयोजना, विशेष घटक योजना, अनुशेषांतर्गत योजनांचे सन २०११-१२ करिता आठमाही सुधारित अंदाजपत्रक सहाव्या वेतन आयोगानुसार दि. १.१.२००६ ते ३१.३.२००९ कालावधीच्या वेतन फरकाचा खर्च दर्शविणारा तक्ता.

| अ. क्र. | कर्मचारी संख्या | तपशील | दि. १.१.२००६ ते ३१.३.२००९ ची एकूण देय थकबाकी (अग्रीम वजा जाता) | पहिला हप्ता २००९-१० | दुसरा हप्ता २०१०-११ | तिसरा हप्ता २०११-१२ | चौथा हप्ता २०१२-१३ | पाचवा हप्ता २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| १ | | | भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा | | | | | |
| २ | | | रोखीने अदा | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

टिप :- अंशदायी निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत जमा होणारा फरक असल्यास फरकाची रक्कम व कर्मचारी संख्या तक्त्यामध्ये स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावी.

PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

## विवरण पत्र ८ - सन २०११-१२ चे आठमाही सुधारित अंदाजपत्रक छाननी कार्यक्रम
## स्थळ : शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

| | | दिनांक | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | सोलापूर | २.१२.२०११ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर<br>अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, सोलापूर<br>लेखाधिकारी, शिक्षण खाते, सोलापूर<br>पिठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, सोलापूर<br>प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, सोलापूर<br>प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, बार्शी<br>प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, मंगळवेढा<br>प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, पंढरपूर<br>अधिक्षक, प्राथमिक वेतन पथक, सोलापूर<br>शि. अ., महाराष्ट्र छात्र सेना, सोलापूर |
| २. | अहमदनगर | ३.१२.२०११ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर<br>अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, अहमदनगर<br>लेखाधिकारी, शिक्षण खाते, अहमदनगर<br>प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, अहमदनगर<br>प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, राहूरी<br>प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, श्रीरामपूर<br>प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, संगमनेर<br>अधिक्षक, प्राथमिक वेतन पथक, अहमदनगर<br>शि. अ., महाराष्ट्र छात्र सेना, अहमदनगर |
| ३. | पुणे | ५.१२.२०११ | शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे<br>अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे<br>लेखाधिकारी, शिक्षण खाते, पुणे<br>पिठासीन अधिकारी, शाळा न्यायाधीकरण, पुणे<br>अधिक्षक, प्राथमिक वेतन पथक, पुणे |
| ४. | ट्रेनिंग कॉलेज | ५.१२.२०११ | प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय उर्दू (मुलांचे), पुणे<br>प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय उर्दू (मुलींचे), पुणे<br>प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, लोणी काळभोर, जि. पुणे<br>प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर, जि. अहमदनगर<br>शि. अ., महाराष्ट्र छात्र सेना,, पुणे |

PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

ा-२/अमासूअ/२०१०/२३७२९-६२, दि. २५.११.२०११